शपथेवर सुरु
सरकारतर्फे साक्षीदार क्र.५ चा सरतपासः-

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,
माझे नावः - पो.हे.कॉ/१७२५ नानासाहेब रमेश तुपे,
वयः - ४० वर्षे,
नेमणुक - सोनई पोलीस स्टेशन, ता. नेवासा, जि.अ.नगर.

अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम. के. सोनवणे यांचे मार्फत सुरुः-

दि.२८/०६/२०२२ रोजी मी सोनई पोलिस स्टेशनला पो.ना. या पदावर कार्यरत होतो. त्या दिवशी गु.र.क्र. २३४/२०२२ चा तपास माझ्याकडे आला होता. आदेश, फिर्याद, दैनिक अहवाल व तपास आदेश तपासाकामी देण्यात आला होता. आता मला सदरचा तपास आदेश दाखवण्यात आला. तो तोच आहे. त्यावर पोलिस हवालदार राखे यांची सही आहे. ते माझे सहकारी असल्याने मी त्यांची सही ओळखतो. त्यातील संपूर्ण मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी ३८ देण्यात येते.

२. कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. सदर घटना ठिकाण हे राजेगाव मध्ये होते. आता मला घटनास्थळ कम जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी व दोन पंचाच्या सह्या असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यांस निशाणी ३९ देण्यात येते.

३. साक्षीदारांचे जबाब नोंदवले. गुन्हातील हत्यार लाकडी दांडा जप्त केला. त्याप्रमाणे मुद्देमाल पावती तयार केली. जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळणेकामी पत्र व्यवहार केला. आता मला सदरचे पत्र दाखविण्यात आले. ते तेच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी ४० देण्यात येते.

४. आरोपीस हजर राहण्यासाठी फौ.प्र.सं. कलम ४१ प्रमाणे नोटीस दिली. आता मला सदरची नोटीस दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी ४१ देण्यात येते. वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले व दोषारोपपत्रात सामिल केले. आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने दोषारोपपत्र दाखल केले. आता मला लाकडी दांडा 'आर्टीकल अ' दाखवण्यात आला. तो तोच आहे. आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. आजरोजी न्यायालयात आरोपी हजर नाही.
सरतपास पुर्ण.

उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. पी.सी.नहार यांचेमार्फत सुरु-

५. हे म्हणणे खरे आहे की, आदेशावर माझी सही नाही. हे म्हणणे खरे आहे की, राजेगाव येथे आजुबाजुला लोकवस्ती आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलिस स्टेशनजवळ एक

लाकडी वखार आहे. हे म्हणणे खरे नाही की, वखारीतुन लाकडी दांडा आणला. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा मी पोलिस स्टेशनला तयार केला. हे म्हणणे खरे आहे की, नातेवाईकां व्यतिरीक्त मी आजुबाजुच्या लोकांचे जबाब घेतले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने फिर्यादीला कधीही मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, भावकीच्या वादातुन फिर्यादीने आरोपीविरूध्द घटनेच्या दुस-या दिवशी खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकुर मी खोटा सांगितला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडुन कोणताही मुद्देमाल जप्त केलेला नाही.

उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-
(ए.एन.सरक)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा

दिनांक- ०९/०३/२०२६.